# सुप्तगुणांचा उपयोग समाज विकासासाठी करा : डॉ. कलशेट्टी

## शिवाजी विद्यापीठात 'प्रशासनातील नेतृत्व' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपल्यातील सुप्तगुणांचा समाज विकासासाठी उपयोग करावा, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी केले. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'प्रशासनातील नेतृत्व' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

आयुक्त डॉ.कलशेट्टी पुढे म्हणाले, कोणतेही काम हाती घेतल्यानंतर ते मार्गी लावण्यासाठी नेतृत्वगुणांची आवश्यकता असते. त्या कामात यश मिळण्यासाठी नेतृत्व, नियोजन, नियंत्रण आणि मार्गदर्शनाची गरज भासते. आपल्या कामाशी प्रामाणिक व सकारात्मक राहून आपल्या सहकार्यांमध्ये उत्साह व ऊर्जा निर्माण करण्याचे कौशल्ये असले पाहिजे. विविध अभियानांमध्ये कामे करीत असताना आपले व्यक्तिमत्त्व विकास उत्तम प्रकारे होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. विविध शाखांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत नेतृत्व कौशल्ये आत्मसात केले पाहिजेत. दिलेल्या जबाबादारी पेक्षा आपली आवड पाहून अतिरिक्त काम करण्याची जिद्द असली पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, संशोधनाच्या माध्यम तून समाजहीत जोपासण्यासाठी विद्यार्थिंनी प्राथमिकता दिली पाहिजे. विद्यार्थिदशेत वावरताना प्रत्येक कार्यक्रमामध्ये पुढाकार घेऊन, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची इच्छा पाहिजे. एखाद्या कार्यामध्ये लोकांचा सहभाग, विविध घटकांचा सहभाग कसे वाढविता येईल यावर मंथन केले पाहिजे.

यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठता डॉ.श्रीमती मीनाक्षी गजभिये उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र अधिविभागाचे डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठ परिसरातील विविध अधिविभागांम धील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# समीक्षेत प्रयोगशीलतेची गरज

## सुधीर रसाळ : डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सैद्धांतिक समीक्षेबरोबरच किमान प्राथमिक समीक्षेतही प्रयोगशीलता येणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठ व म. सु. पाटील कुटुंबीयांच्या वतीने यंदाचा पहिलाच डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत डहाके यांच्या हस्ते रसाळ यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना रसाळ बोलत होते. सन्मानचिन्ह, मानपत्र व रोख ५१ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



**कोल्हापूर : मु. स. पाटील समीक्षा पुरस्कार वसंत डहाके यांच्या हस्ते स्वीकारताना सुधीर रसाळ. शेजारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राजन गवस, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे आदी.**

जागतिक स्तरावर भाषिक देवाणघेवाण होण्यासाठी भारतीय साहित्य संकल्पनांचे आस्तित्व मराठी साहित्यात आले पाहिजे. यासाठी मराठी साहित्यातील समीक्षकांच्या नव्या पिढीने मराठी वाड्.मयाची पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे, असे सांगून रसाळ म्हणाले, म. सु. पाटील यांच्या नावाने पुरस्कार स्वीकारतानाचा आनंद व त्यांची उणीव अशा संमिश्र भावना आहेत. समीक्षा ही प्रसिद्धी वलयापासून अलिप्त आहे. या क्षेत्रात अपेक्षित प्रगती न झाल्याची खंत आहे. समीक्षा साहित्य प्रकार जेमतेम दीडशे वर्षांचा आहे. या साहित्य प्रकाराला दीर्घ परंपरा नाही; मात्र या काळात समीक्षेमध्ये भरीव काम होण्यासाठी फारसे प्रयत्न गेल्या पिढीतल्या समीक्षकांकडून झाले नाहीत.

वसंत डहाके यांनी म्हणाले, मराठी साहित्यात समीक्षक घडले पाहिजेत. समीक्षेमध्ये भारतीय साहित्य शास्त्रातील सिद्धांत येत असल्याने वाचकांना साहित्याचे आकलन होणे शक्य होते.

डॉ. डी. टी. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. म. सु. पाटील यांच्या कन्या कवयत्री नीरजा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. राजन गवस यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे आदींसह मराठी साहित्य क्षेत्रातील मान्यवर, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.